स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्याशी सलग्नित

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

इतिहास विभाग

यांना

तृतीय वर्ष कला या पदवी करिता सादर करावयाचा संशोधन प्रकल्प


# “लातूर पॅटर्न : एक अभ्यास”


सादरकर्ती

कु. कोमल विलास राठोड

विद्यार्थिनी, तृतीय वर्ष कला

मार्गदर्शक

लेफ्ट. डॉ. अर्चना धनराज टाक

सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख

डॉ. महादेव गव्हाणे

प्राचार्य

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),

लातूर- ४१३५१२.



एप्रिल २०२३

# प्रतिज्ञापत्र

**"लातूर पॅटर्न : एक अभ्यास"** या विषयावरील प्रस्तुत प्रकल्प मी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या तृतीय वर्ष कला या  पदवीसाठी लिहिलेला आहे. या प्रकल्पात समाविष्ट करण्यात आलेले कार्य माझ्या स्वतःच्या प्रयत्नांचे फलित आहे. त्यासाठी माझ्या मार्गदर्शकांकडून मिळालेले मार्गदर्शन आणि यापूर्वी झालेल्या संशोधनांचे संदर्भ याशिवाय कशाचीही मदत घेण्यात आली नाही. उपयोगात आणलेल्या संदर्भांचा योग्य निर्देश करण्यात आला आहे. हा प्रकल्प अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

**स्थळ:** लातूर

**दिनांक: ०६/०४/२०२३**

**सादरकर्ता**

**कु. कोमल विलास राठोड**
विद्यार्थिनी
तृतीय वर्ष कला
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्याशी सलग्नित

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

## इतिहास विभाग

### तृतीय वर्ष कला

### २०२२-२३

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कु. कोमल विलास राठोड** यांनी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या तृतीय वर्ष कला या पदवीसाठी सादर केलेल्या **"लातूर पॅटर्न : एक अभ्यास"** हा संशोधन प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. प्रकल्प लेखनात ज्या संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आला आहे. त्याचा यथोचित निर्देश केला आहे. **कु. कोमल विलास राठोड** यांनी हा प्रकल्प स्वतंत्ररित्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात, कोणत्याही अन्य परिक्षेसाठी सादर केला नाही. सदरचा प्रकल्प राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष कला (Bachelor of Arts) या पदवीसाठी सादर करण्याची माझी अनुमती आहे.

**Exam Seat No.:** RAS2360064

**स्थळ**: लातूर

**दिनांक: ०६/०४/२०२३**

**मार्गदर्शक**
**लेफ्ट. डॉ. अर्चना धनराज टाक**
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख
इतिहास विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
पिन कोड – ४१३५१२

# ऋणनिर्देश...

आयुष्यात अनेक लोक हे आपल्याला भेटत असतात, जेव्हा एखादे चांगले काम करण्यासाठी आपण हातात घेतो, तेव्हा काही लोक ते काम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करत असतात, तर काही लोक त्या कामात अडचणी कशा निर्माण होतील याची वाट पाहत असतात. परंतु अशा चांगल्या कामात मला साथ देणारे, मला प्रोत्साहन देणारे, मला सहकार्य करणारे अनेकजण आहेत, त्यांचा उल्लेख केल्याशिवाय ह्या प्रकल्प अभ्यासास पुर्णत्व येणार नाही.

कोणतेही कार्य करण्याचे निश्चित केल्यास त्या कार्याचा संकल्प व्यवस्थिपणे पूर्ण होण्यासाठी त्या व्यक्तीला स्वतः प्रयत्न करावे लागतात, परंतु आसपासच्या अन्य व्यक्तींचा मोलाचा सहभाग, सहकार्य असल्याशिवय ते शक्य होत नाही. प्रस्तुत प्रकल्प अभ्यासाचा विषय निश्चित करण्यापासून ते प्रकल्प अभ्यास कार्य पूर्णत्वास नेण्यापर्यंत अनेकांचे अनेक प्रकारे अत्यंत अनमोल सहकार्य लाभले आहे. याठिकाणी त्यांचे आभार मानने उचित ठरेल असे मला वाटते.

ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. गोपाळरावजी पाटील साहेब, उपाध्यक्ष आदरणीय डॉ. पी. आर. देशमुख सर, लातूर पॅटर्नचे जनक असलेले संस्थेचे सचिव आदरणीय प्राचार्य अनिरुद्ध जाधव सर, सहसचिव आदरणीय श्री. गोपाळ शिंदे सर, सहसचिव आदरणीय श्री. सुनील सोनवणे सर, सदस्य आदरणीय डॉ. रावसाहेब कावळे सर यांच्या आशीर्वादाचे हात माझ्या डोक्यावर असल्यामुळेच मी हे प्रकल्प लेखन कार्य पूर्ण करू शकले.

प्रत्येक चांगल्या कामासाठी आम्हां सर्व विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणारे व तितक्याच कर्तव्यदक्षपणाने आमच्या चुका निदर्शनास आणुन देणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेले, आमचे पूज्यनीय प्रेरणास्थान असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. महादेव गव्हाणे सर आणि उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे सर यांनी मला सतत दिलेले प्रोत्साहन व त्यांनी केलेले सहकार्य याबद्दल मी त्यांचे आभार न मानता त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करीन.

कोणत्याही कार्याची पुर्तता होण्यासाठी उत्कृष्ट व चांगले मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते. असेच मार्गदर्शक मला मिळाले, राजर्षी शाहू महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख लेफ्ट. डॉ. अर्चना टाक यांनी संपूर्ण प्रकल्प अभ्यास प्रक्रियेमध्ये केलेल्या उत्कृष्ट, अचुक व मौलिक मार्गदर्शनामुळेच मी प्रकल्प लेखन कार्य पूर्ण करू शकले. त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून, प्रोत्साहन देऊन, वेळ, काळ व स्थळाचे बंधन न ठेवता निरपेक्ष व कर्तव्यबुध्दीने मार्गदर्शन केलेले आहे. तसेच त्यांनी या संपूर्ण प्रकल्पाची छपाई अल्पवेळेत व सुबकपणे विनामुल्य करून दिल्यामुळेच हे कार्य निहित वेळेत पूर्ण होऊ शकले. त्यामुळे मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे.

कुटुंबाच्या सहकार्याशिवाय कोणतेही काम करणे कठीण असते. कुटुंबाकडून आपल्याला मानसिक आधार मिळत असतो. असा मानसिक आधार दिल्याबद्दल मी माझे पूज्यनीय आई-वडील सौ. कमलाबाई व श्री. विलास राठोड यांचे मनापासून आभार मानते. तसेच माझी बहिण कु. शितल व मैत्रीण कु. बुशरा शेख यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार मानते.

**धन्यवाद !!!**

**कु. कोमल विलास राठोड**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **१** | **प्रकल्प अभ्यास पद्धती** | **१ ते ५** |
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | प्रकल्प अभ्यास विषयाची निवड | १ |
| ३ | पूर्व अभ्यासाचा आढावा | २ |
| ४ | प्रकल्प अभ्यास विषयाची गरज | २ |
| ५ | प्रकल्प अभ्यास विषयाचे महत्व | २ |
| ६ | समस्या विधान | २ |
| ७ | प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश | ३ |
| ८ | प्रकल्प अभ्यासाची गृहीतके | ३ |
| ९ | प्रकल्प अभ्यास प्रश्न | ३ |
| १० | प्रकल्प विषयाची व्याप्ती | ३ |
| ११ | प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा | ४ |
| १२ | प्रकल्प अभ्यासाची मर्यादा | ४ |
| १३ | माहिती संकलनाचे स्त्रोत | ४ ते ५ |
| १४ | प्रकरण विभागणी | ५ |
| **२** | **लातूर पॅटर्न** | **६ ते १५** |
| १ | शिव छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना | ६ |
| २ | यशवंत विद्यालय, लातूर | ७ |
| ३ | राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर | ७ ते १० |
| ४ | लातूर पॅटर्नची वैशिष्ट्ये | १० ते ११ |
| ५ | प्राध्यापकांचा सहभाग व शिक्षण पद्धती | ११ ते १२ |
| ६ | उच्च महाविद्यालय व लातूर पॅटर्न | १२ ते १४ |
| ७ | लातूर पॅटर्नचे महत्व | १५ |

| | | |
|---|---|---|
| ८ | लातूर पॅटर्नचा समाजावर पडलेला प्रभाव | १५ |
| **३** | **लातूर पॅटर्नचे जनक : प्राचार्य अनिरुद्ध जाधव** | **१६ ते २३** |
| **४** | **उपसंहार** | **२४ ते २६** |
| | **संदर्भ सूची** | **२७ ते २९** |
| | **परिशिष्ट** | **I -** |
| १ | राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर – स्थापनेपासून ते आत्तापर्यंतची प्राचार्य यादी | **I** |
| २ | शाहुरात्न पुरस्कारर्थींची यादी | **II** |
| ३ | शाहुभूषण पुरस्कारर्थींची यादी | |
| ४ | शाहुश्री पुरस्कारर्थींची यादी | |
| ५ | शासन व इतर मान्यताप्राप्त संस्थांकडून महाविद्यालयास प्राप्त झालेले सन्मान (२०१८ ते २०२२) | |
| ६ | छायाचित्रे | |
| ७ | मुलाखत | |
| अ | मा. प्राचार्य अनिरुद्ध जाधव,<br>सचिव,<br>शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर | |
| ब | मा. डॉ. महादेव गव्हाणे,<br>प्राचार्य,<br>राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर | |

# प्रकरण पहिले :
# प्रकल्प अभ्यास पद्धती

# प्रकरण पहिले

# प्रकल्प अभ्यास पद्धती

## १. प्रस्तावना :- (Introduction)

माझ्या संशोधनाचा विषय **"लातूर पॅटर्न : एक अभ्यास"** हा आहे. या विषयावर मुबलक प्रमाणात संदर्भ साधने उपलब्ध असल्यामुळे व या विषयाबद्दल विदयार्थ्यांना माहिती मिळावी यासाठी मी या विषयाची निवड केली आहे. शिव छत्रपती शिक्षण संस्थेने इ.स. १९७० या वर्षी महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक क्रांतीचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या नावाने महाविद्यालय सुरू केले. राखेतून जन्म घेणारा फिनिक्स पक्षी हे या महाविद्यालयाचे बोधचिन्ह निवडले गेले. सुरुवातीच्या काळात महाविद्यालयाला अनेक अडचणी 'आल्या परंतु नंतर महाविद्यालयाने शिक्षणाच्या क्षेत्रात आपला एक पॅटर्नच उदयास आणला तो म्हणजे लातूर पॅटर्न.

सध्याच्या काळात शिक्षणात नवीन तंत्रज्ञान, विज्ञान यांचा वापर केला जात आहे. लातूर पॅटर्न हा विद्यार्थ्यांना या नवीन काळात स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी तयार करत आहे व तसे शिक्षण लातूर पॅटर्न द्वारे विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. "विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्रशासन, संस्थाचालक या सर्वांच्या सामुहिक सुनियोजित, सुसूत्र व उद्दिष्टाधिष्ठित शिक्षणपद्धती म्हणजे लातूर पॅटर्न किंवा शाहू पॅटर्न होय."[१] अशी व्याख्या ज्यांच्या स्वप्रयत्नातून हा पॅटर्न उत्क्रांत झाला विकसित झाला त्या प्रशासन व व्यवस्थापनानेच दिलेली आहे.

शिक्षण प्रक्रियेमध्ये सक्रिय असणारे सर्व मानवी घटक शिक्षणातील अध्ययन-अध्यापन, मूल्यमापन, उद्दिष्ट निश्चिती, उपक्रम रचना, काटेकोर अंमलबजावणी इ. प्रक्रियांचा सुयोग्य समन्वय साधून अध्ययन निष्पत्तीचे उदिष्ट प्राप्त केले जाते व त्यातूनच तयार झाला तो गुणवत्तेचा पॅटर्न म्हणजे शाहू पॅटर्न होय. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आपल्या भाषणातून शाहू पॅटर्नचे नामकरण लातूर पॅटर्न असे केले. पुढे राज्यात व देशात हेच नाव प्रसिद्ध झाले. शाहू पॅटर्न हा उत्क्रांत होत गेलेला आहे. विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबविताना येणाऱ्या अडचणी प्रत्येक टप्प्यावर दूर करून, गुणवत्ता वाढीचे प्रयत्न केले गेले. सातत्याने या पॅटर्नमध्ये गरज असेल तेव्हा सुधारणा करण्यात आल्या अनेक वर्षांच्या मेहनतीतून सुधारणांतून हा पॅटर्न विकसित होत गेला आहे.

## २. प्रकल्प अभ्यास विषयाची निवड :- (Selection of the Research Project Topic)

प्रस्तुत प्रकल्प अभ्यास विषयासाठी **“लातूर पॅटर्न : एक अभ्यास”** या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**३. पूर्व अभ्यासाचा अढावा :-**

**“लातूर पॅटर्न : एक अभ्यास”** हा विषय मी प्रस्तुत प्रकल्प अभ्यासासाठी निवडला आहे. अभ्यास विषय निवडत असताना याची काळजी घेतली जाते की, संबंधित विषयावर यापूर्वी संशोधन सर्वांगाने झालेले नसावे. यापूर्वी लातूर पॅटर्न या विषयावर मोठ्या स्वरुपात संशोधन  झालेले नाही. काही प्रमाणात लेख लिहिले गेले आहेत. परंतु ते खूपच थोड्या लोकांनी लिहिलेले आहेत. राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) लातूर, यांच्या इतिहास विभागाला आतापर्यंत सादर केल्या गेलेल्या प्रकल्पांमध्ये यापूर्वी कोणीही या विषयाची निवड केलेली नाही. या विषयावर संदर्भ साधने देखील विपुल प्रमाणावर उपलब्ध आहेत.

**४. प्रकल्प अभ्यासाची गरज: (Needs of the Research)**

**१.** इतर अभ्यासकांना कार्यप्रेरणा मिळवण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**२.** या विषयावर कमी प्रमाणात अभ्यास झालेला आहे. त्यामुळे सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**३.** महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासाला कलाटणी देणाऱ्या लातूर पॅटर्नचे उगमस्थान असलेल्या राजर्षी शाहू महाविद्यालयाने काय योगदान दिले व त्याचे काय परिणाम झाले हे जाणून घेण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**४.** महाराष्ट्राचा शैक्षणिक इतिहास यासंदर्भात अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना अभ्यासाची दिशा मिळण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

**५. प्रकल्प अभ्यासाचे महत्व: (Significance of the Research)**

१) लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील नवनवीन शैक्षणिक प्रयोगांबद्दल माहिती समजण्यासाठी प्रस्तुत विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

२) महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे, हे समजण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

३) लातूर पॅटर्न व राजर्षी शाहू महाविद्यालयाचे कार्य सद्यस्थितीत प्रेरणादायी ठरविण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

**६. समस्या विधान :(Origin of the Research Problem)**

लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाद्वारे शिक्षणात यापूर्वी राबविण्यात आलेल्या व सातत्याने राबविण्यात येणाऱ्या नवनवीन प्रयोगांचा महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीच्या दृष्टीने अभ्यास करणे.

**७. प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश :- (Objectives)**

१. सुमारे पन्नास वर्षांपूर्वीच्या लातुरमधील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. लातूर पॅटर्न म्हणजे काय? याचा अभ्यास करणे.

३. राजर्षी शाहू महाविद्यालयात झालेली लातूर पॅटर्नची निर्मिती व विकास यांचा अभ्यास करणे.

४. या पॅटर्नची विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये काय उपयुक्तता आहे याचा अभ्यास करणे.

५. या पॅटर्नद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची माहिती मिळविणे.

६. लातूर पॅटर्नचा विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, समाज व जीवनातील विविध क्षेत्रांवर कोणता प्रभाव पडला याचा अभ्यास करणे.

**८. प्रकल्प अभ्यासाची गृहीतके:**

**१.** लातूर पॅटर्न ही एक शैक्षणिक चळवळ आहे.

**२.** शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, सचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव व प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे हे लातूर पॅटर्नचे निर्माते आहेत.

**३.** लातूर पॅटर्नचे उगमस्थान असलेले लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालय हे शिक्षणाच्या क्षेत्रात नवनवीन प्रयोग राबविणारे एक नामांकित महाविद्यालय आहे.

९. **प्रकल्प अभ्यास प्रश्न:**

**१.** लातूर पॅटर्न म्हणजे काय?

**२.** लातूर पॅटर्नचे जनक कोण आहेत?

**३.** महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे?

४. राजर्षी शाहू महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांच्या व्यक्तिमत्व विकासात लातूर पॅटर्नचे काय योगदान राहिलेले आहे?

## १०. प्रकल्प अभ्यासाची व्याप्ती: (Scope of the Research)

१. प्रस्तुत अभ्यास हा लातूर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्राशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत अभ्यास हा शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर यांच्यातील प्रत्येक घटकाशी संबंधित आहे.

## ११. प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा: (De-Limitations of the Research)

१. प्रस्तुत अभ्यासात फक्त लातूर जिल्ह्याचाच विचार केलेला आहे .

२. प्रस्तुत अभ्यासात फक्त लातूर येथील शिव छत्रपती शिक्षण संस्थेतील सर्व घटकांचा विचार केलेला आहे .

## १२. प्रकल्प अभ्यासाची मर्यादा: (Limitations of the Research)

१. प्रस्तुत अभ्यासासाठी वापरली जाणारी प्रश्नावली व मुलाखत सूची ही साधने संशोधिका तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार प्रमाणित करणार आहे.

२. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे प्रश्नावली व मुलाखतींतून आलेल्या उत्तरांवर अवलंबून असणार आहेत.

## १३. माहिती संकलनाचे स्त्रोत:-

प्रस्तुत प्रकल्पासाठी नव्याने साधने शोधून त्याआधारे अभ्यास करण्यात आलेला आहे. त्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

१. महाविद्यालयातील अनुभवी व्यक्ती, शिक्षक. कर्मचारी इ.ची मुलाखत घेवून या विषयाशी संबंधित माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

२. महाविद्यालयातील अनुभवी व्यक्ती, शिक्षक. कर्मचारी इ.कडून प्रश्नावली भरून घेवून या विषयाशी संबंधित माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

३. राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या शब्दगंध या वार्षिक अंकाचे १९७४-७५ पासूनचे एकूण २६ अंक महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील ग्रंथालयात उपलब्ध झाले. त्यांचा वापर प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात आलेला आहे.

४. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या विविध बातम्या संदर्भ म्हणून वापरण्यात आलेल्या आहेत.

५. शिक्षण खात्यामार्फत वेळोवेळी कार्यान्वित होणाऱ्या योजनांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

६. विविध संदर्भ ग्रंथ, चरित्र व आत्मचरित्रपर ग्रंथ यांचा वापर प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात आलेला आहे.

७. इतिहास विभाग व शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे कार्यालय यांचेकडून प्राप्त झालेल्या विविध छायाचित्रांचा संदर्भ म्हणून वापर करण्यात आलेला आहे.

८. www.shahucollegelatur.org in या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरूनप्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यात आलेली आहे.

**१४. प्रकरण विभागणी:**

या प्रकल्प अभ्यास विषयाची चार प्रकरणांमध्ये विभागणी केली आहे ती पुढीलप्रमाणे,

**१. प्रकल्प अभ्यासपद्धती:**

प्रस्तुत प्रकरणामध्ये या प्रकल्पाकरिता वापरण्यात येणाऱ्या अभ्यास पद्धतीचा आढावा घेण्यात आलेला आहे. अभ्यासासाठी प्रस्तुत विषयाची निवड केल्यानंतर प्रस्तावना, पूर्व अभ्यासाचा आढावा, प्रकल्प अभ्यासाची गरज, प्रकल्प अभ्यासाचे महत्व, समस्या विधान, प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश, प्रकल्प अभ्यासाची गृहीतके, प्रकल्प अभ्यास प्रश्न, प्रकल्प अभ्यासाची व्याप्ती, प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा, प्रकल्प अभ्यासाची मर्यादा, माहिती संकलनाचे स्त्रोत आणि प्रकरण विभागणी इ. ची मांडणी करण्यात आलेली आहे.

**२. लातूर पॅटर्न:**

शिव छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना, उदिदष्टे, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर पॅटर्नची सविस्तर ओळख व लातूर पॅटर्नची उपयुक्तता तसेच त्याचा समाजावर पडलेला प्रभाव व लातूर पॅटर्नचे महत्त्व इ. चा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेला आहे.

**३. लातूर पॅटर्नचे जनक: प्राचार्य अनिरुद्ध जाधव:**

शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारक ठरलेला लातूर पॅटर्न ज्यांच्या प्रयत्नांनी व परिश्रमाने उदयास आला व विकसित झाला अशा लातूर पॅटर्नचे जनक प्राचार्य अनिरुद्ध जाधव सर यांच्या तसेच निरलसपणे सेवा कार्य करणारे शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील या दोघांच्या व्यक्तीमत्त्वाच्या व कार्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणातून करण्यात आलेला आहे.

**४. उपसंहार:**

या प्रकरणात संपूर्ण प्रकल्पाचा सारांश व निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.

# प्रकरण दुसरे : लातूर पॅटर्न

# प्रकरण दुसरे

# लातूर पॅटर्न

**शिव छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना:**

इ.स. १९६७-६८ या वर्षात ग्रामीण शेतकरी कुटुंबात शिक्षण घेवून लातूर येथे वेगवेगळया क्षेत्रात व व्यवसायात कार्यरत असलेल्या काही ध्येयवादी व्यक्तींनी शिव छत्रपती शिक्षण संस्था स्थापन केली. त्यामध्ये अँड. किशनराव साळुंके पाटील, डॉ. गोपाळराव पाटील, डॉ. पी. आर. देशमुख, डॉ. एन. पी. गरड, अँड. नारायण पाटील, अँड. किसनराव सावरीकर, अँड. मुरलीधर शिंदे, डॉ. विष्णुपंत गोरे, श्री. गुरुनाथराव चव्हाण, श्री. भगवानराव तळेकर , प्रा. अनिरुद्ध जाधव, श्री. भूदेव पाटील, श्री. रूपचंद मालपाणी, श्री. भाऊसाहेब देशमुख, श्री. व्यंकटराव पाटील जवळगेकर, श्री. देवीदासराव भोसले, श्री. नागोराव माने, श्री. शहाजीराव मुळे, श्री. सूर्यकरण तळेकर इ. यांचा समावेश होता. या मंडळीजवळ आर्थिक पाठबळ नव्हते परंतु उपेक्षित मुलांना शिक्षण देणे हे ध्येय मात्र त्यांच्याकडे होते व या ध्येयासाठीच त्यांनी कार्य केले. या सर्वांनीच समाजातील उपेक्षित क्षेत्राचा विकास करणे हे ध्येय समोर ठेवले व त्यासाठीच त्यांनी आपले सर्वस्व पणाला लावले व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता कार्य केले.

एक सामाजिक घटक म्हणून समाजासाठी आपण काहीतरी करु शकतो, समाजाप्रती आपणही बांधलेलो आहोत ही जाणीव स्वार्थीपणामुळे सर्वांच्याच मनामध्ये निर्माण होत नाही व ज्यांच्या मध्ये निर्माण होते ते मानवतेचे सेवक असतात. शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे संस्थापक व संचालक हे त्यापैकीच आहेत. सामाजिक बांधिलकीच्या नात्याने आपण मानवता जपलीच पाहिजे असे त्यांना वाटते. समाज हा आपणच बनवतो व घडवतो, त्यांनी शिकवलेली विद्या, त्यांना मिळालेली पदे, अधिकार हे त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी वापरले हेच परिपूर्ण व्यक्तीमत्त्व असते. संस्थेच्या प्रयत्नाने लातूर शहराच्या उपेक्षित अशा पूर्व भागात नांदेड रोडवर चार-पाच एकर शासकीय जागा मिळाली या ठिकाणी गोदामाच्या आकारातील पत्र्याची इमारत संस्थेतर्फे बांधण्यात आली. या इमारतीच्या आजूबाजूला दलित, महारोगी इ. ची वस्ती असल्यामुळे शहरांतील श्रीमंत व्यक्तींची मुले या कॉलेजकडे आलीच नाहीत. सुरुवातीच्या दहा-बारा वर्षांमध्ये संस्थेला प्रतिकुल परिस्थितीला व आर्थिक समस्यांना सतत सामोरे जावे लागले, ही संस्थेची शून्यातून झालेली सुरुवात होय.

राखेतून जन्म घेतलेला फिनिक्स पक्षी हे बोधचिन्ह राजर्षी शाहू महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या सल्ल्यावरून निवडले गेले. सुरुवातीलाअत्यंत खडतर अशा प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल केल्यानंतर इ.स. १९८० च्या पुढील काळात या संस्थेने राखेतील फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी

घेतली. त्यासाठी संस्थेला अनेक अडथळे पार करावे लागले. रयतेला शिक्षण देणे, हेच या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे . या उदिष्टपूर्तीसाठी संस्थेने इ.स. १९६८ यावर्षी यशवंत  विद्यालयाची स्थापना केली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील हे समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांनी भारावून गेलेले होते. त्यामुळेच राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंत हे विद्यालयाला देण्यात आले होते. इ.स. १९७० यावर्षी  मध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

आज शिव छत्रपती शिक्षण संस्थेला वटवृक्षाचे विशाल स्वरूप प्राप्त झाले आहे. संस्थेला आरंभापासून आजपर्यंत ध्येयवादी व एकमुखी नेतृत्व लाभलेले आहे. संस्थेच्या सुरुवातीला जी कार्यकारिणी होती तीच कार्यकारिणी आजही अस्तित्त्वात (कायम) आहे. अँड. किशनराव साळुंके पाटील यांच्या दुर्दैवी निधनानंतर त्यांचे बंधु डॉ. गोपाळराव पाटील संस्थेचे अध्यक्ष झाले. तेच या शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे आधार व प्रेरणास्थान आहेत. आजही डॉ. गोपाळराव पाटील शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आहेत. सर्वांच्या सामुहिक प्रयत्नाने ही संस्था कार्यरत झाली व ती आज शैक्षणिक क्षेत्रामध्ये एक क्रांती घडवून आणत आहे. शिक्षण हे सामाजिक कार्य समजून संस्थेची वाटचाल चालू आहे. शिक्षणाला व्यवसाय अथवा धंदा न समजता शिक्षण हे एक धर्मादाय काम आहे याचा विसर न पडू देता संस्था कार्यरत आहे

**यशवंत विद्यालय, लातूर: (स्थापना वर्ष – इ.स. १९६८)**

शिव छत्रपती शिक्षण संस्थेची पहिली शाळा म्हणजे यशवंत विद्यालय होय. इ.स. १९६८ यावर्षी या शाळेची सुरुवात झाली. खंडोबा गल्लीत खुब्बा यांच्या वाड्यात दोन खोल्यांत ही शाळा सुरु झाली. संस्थेच्या संस्थापकांवर शाहू महाराजांच्या विचारांचा पगडा होता, म्हणूनच शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंत म्हणून शाळेला यशवंत विद्यालय असे नाव देण्यात आले. स्थापने वेळी या विद्यालयात ११२ विद्यार्थी, ४ शिक्षक व १ शिक्षकेतर कर्मचारी एवढेच मानव संसाधन होते. आज या विद्यालयामध्ये सुमारे १५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आता सध्या नांदेडरोडवर यशवंत विद्यालयाची स्वतः ची प्रशस्त इमारत उभी आहे. या विद्यालयाच्या आरंभापासूनच दर्जेदार व गुणात्मक शिक्षणाला सुरुवात करण्यात आली. यशवंत विद्यालय हे लातूरमधील नामवंत विद्यालयांपैकी एक आहे.

**राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर: (स्थापना वर्ष – इ.स. १९७०)**

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे राजर्षी शाहू महाविद्यालय हे शैक्षणिक गुणवत्तेचे उर्जाकेंद्र म्हणून ओळखले जाते. शिव छत्रपती शिक्षण संस्थेने इ.स. १९७० यावर्षी महाराष्ट्रातील सामाजिक-आर्थिक क्रांतीचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या नावाने महाविद्यालय सुरू केले. महाविदयालयाला सुरुवातीला स्वत: ची

इमारत नव्हती. यशवंत विद्यालयाच्या बाजूलाच महाविद्यालयासाठी ६ खोल्यांचे टिनशेड उभे करण्यत आले होते. लातूर शहरात १९६०-६१ मध्ये दयानंद महाविदयालयाची स्थापना झाली होती. या कॉलेजला लातूरच्या व्यापारी वर्गाचे अर्थसहाय्य होते. त्यांची स्वत: ची अशी प्रशस्त इमारत होती. दयानंद महाविद्यालयाला विद्यार्थी संख्या व पैशाच्या बाबतीत कोणत्याच अडचणी आल्या नाहीत. इ.स. १९७० यावर्षी लातूरमध्ये बसवेश्वर महाविद्यालय व राजर्षी शाहू महाविद्यालय अशी आणखी दोन महाविद्यालये स्थापन झाली. बसवेश्वर महाविद्यालयालाही विद्यार्थी व आर्थिक बाबतीत काही अडचणी आल्या नाहीत. त्यांची देशिकेंद्र शाळा त्यांना विद्यार्थ्यांचा पुरवठा करत होती. परंतु राजर्षी शाहू महाविदयालय मात्र सर्व दृष्टींनी अभावग्रस्त होते. कसल्याही प्रकारचे आर्थिक, राजकीय पाठबळ नव्हते. परंतु त्याच्यामागे ग्रामीण भागातील बहुजन समाज मात्र उभा होता.

सुरुवातीच्या काळात महाविद्यालयाला विद्यार्थीच मिळत नव्हते. ग्रामीण भागातील शेतकरी पहिले कारण गरिबीमुळे आपल्या पाल्यांना शिकण्यास पाठवीत नसत. दुसरे कारण म्हणजे मुलांना शिकण्यासाठी पाठविले तर शेतीसाठी लागणारे मनुष्यबळ देखील कमी पडेल असे त्यांना वाटत असे. दहावीचा निकाल लागल्यानंतर प्रा. अनिरुद्ध जाधव, डॉ. जनार्दन वाघमारे श्री. बब्रुवान काळे इ. नी ग्रामीण भागात जावून विद्यार्थ्यांच्या भेटी घेऊ लागले. पालक व विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून सांगू लागले. स्वत:च्या पगारातील पैसा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करू लागले. भारताची भावी तरुण पिढी घडवू लागले. शेतकऱ्यांचा त्यांच्या प्रयत्नांवर विश्वास बसू लागला. कालांतराने हळू-हळू महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या वाढू लागली.

इ.स. १९७२ मध्ये राजर्षी शाहू महाविदयालयाला विज्ञान शाखा सुरू करण्याची परवानगी विद्यापीठाकडून मिळाली. विद्यार्थ्यांचा ओढा विज्ञान शाखेकडेच अधिक होता. विद्यार्थ्यांची संख्या वाढत नव्हती. याचे प्रमुख कारण महाविद्यालयाचे स्थान होते. कारण महाविद्यालय ज्याठिकाणी होते तिथे झोपडपट्ट्या व सर्वत्र घाण पसरलेला भाग होता. तिथे महारोग्यांची वस्ती होती. याकाळात विद्यार्थ्यावरच कॉलेजची पुढची वाटचाल अवलंबून होती. याकाळात विद्यार्थ्यांच्या शुल्कावरच महाविद्यालय चालू होते. शासन काहीही देत नव्हते. इ.स.१९८० पर्यंत महाविद्यालयाची परिस्थिती बिकट झाली होती. महाविद्यालयासाठी जागेचा शोध घेत असताना श्री. काकुशेठ उक्का यांची बंद पडलेली सूत गिरणी नजरेसमोर आली. संस्थेने श्री. काकुशेठ उक्का यांच्याकडून दोन एकर जागा जिनिंग फॅक्टरीच्या इमारतीसह केवळ पाच

लाख रुपयांत खरेदी केली. यानंतर राजर्षी शाहू महाविद्यालयाची जागा बदलली व आता मोठ्या प्रमाणात विद्यार्थी संख्या वाढू लागली.

महाविद्यालय सुरक्षित ठिकाणी आल्यामुळे मुली कॉलेजमध्ये येवू लागल्या. आज महाविद्यालयामध्ये मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे. महाविद्यालयाची जागा बदलणे हा महाविद्यालयासाठी एक टर्निंग पॉईंट होता. यानंतर महाविद्यालयाने प्रगतीला सुरुवात केली. मुंबई येथील डॉन बॉस्को या संस्थेचे रेव्ह. फादर मॅश्चिओ यांनी संस्थेला वेळोवेळी आर्थिक मदत केली. त्यांनी दिलेल्या पैशातून महाविद्यालयातील गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी संस्थेने तीस एकर जमीन खरेदी केली. त्या जमीनीवर मोठी विहीर खोदली. तिला भरपूर पाणी लागले. याद्वारे कमवा व शिका योजना अंमलात आणली गेली. मुंबई सोडून कोठेही न जाणारे रेव्ह. फादर मॅश्चिओ हे संस्थेच्या आग्रहास्तव तीनवेळा लातूरला आले होते.

महाविद्यालयाचे अस्तित्त्व टिकवून ठेवायचे असेल तर महाविद्यालयापुढे एक पर्याय होता, तो म्हणजे गुणवत्ता. महाविद्यालयाची प्रतिकुल परिस्थिती हीच प्राचार्य व शिक्षक यांच्यासाठी प्रेरक ठरली. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढल्याशिवाय महाविद्यालयाच्या अस्तित्त्वाला स्थैर्य प्राप्त होणार नाही, हे त्यांना कळून चुकले. यानंतर त्यांनी पुढील मार्गांचा अवलंब केला.

१. विज्ञानशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला घटक चाचण्यांच्या परीक्षा सुरू केल्या.
२. परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यास सुरुवात केली. जेणेकरून विद्यार्थी अभ्यासासाठी प्रेरित होतील.
३. विद्यार्थ्यांचे निकाल पत्रांद्वारे पालकांना कळविण्यात येऊ लागले.
४. महाविद्यालयामध्ये पालक मेळावा घेण्यास सुरुवात 'केली.
५. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे बोर्डावर लिहिण्यात येऊ लागली. यामुळे सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळू लागले.

दहा वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर राजर्षी शाहू महाविद्यालयाचे विद्यार्थी उच्च माध्यमिक परीक्षेच्या गुणवत्ता यादीमध्ये झळकू लागले. इ.स. १९८० पासून पुढे राजर्षी शाहू महाविद्यालय महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर झळकले. यानंतर महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा आलेख उंचावत गेला, यासाठी दोन घटक कारणीभूत होते:

१. ध्येयवादी, प्रामाणिक व शैक्षणिक दूरदृष्टी असलेले संस्थाचालक.

२. शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी प्रयोग करणारे व अहोरात्र झटणारे तेथील शिक्षक-प्राध्यापक यांची समर्पित वृत्ती.

महाविद्यालयाच्या दरवर्षीच्या उच्च मेरिट मुळे पुणे-मुंबई विभागातील लोकांनी राजर्षी शाहू महाविद्यालयावर टीका करण्याचेही प्रयत्न केले. परंतु महाविद्यालयाची गुणवत्ता वाढतच गेली. बोर्डाच्या लिस्टमध्ये ५०% विद्यार्थी हे राजर्षी शाहू महाविदयालयाचे असत. इ.स. २०१३ यावर्षी राजर्षी शाहू महाविदयालयाने स्वायत्ता स्विकारली. मराठवाड्यामध्ये स्वायत्तता स्वीकारणारे राजर्षी शाहू महाविद्यालय हे पहिले महाविद्यालय आहे.

लातूर पॅटर्न डॉक्टरांसाठी व इंजिनियरसाठी प्रसिद्ध आहे. इ.स. २०१६ मध्ये मराठवाड्यात विशेषत: लातूर जिल्ह्यात भयानक दुष्काळ पडला. मुंबईहून रेल्वेने (जलवाहिनीने) लातूरला पाणी आणले जाऊ लागले. या घटनेमुळे लातूर संपूर्ण देशात गाजले. ते अल्पावधीतच संपूर्ण देशभर प्रसिद्धीच्या झोतात आले. एवढी भयानक परिस्थिती याठिकाणी निर्माण झाली होती. या पाणी प्रकरणामुळे लातूर संपूर्ण देशाला परिचित झाले असले तरी पाणी वगळता जर इतर कोणत्या गोष्टीसाठी लातूर प्रसिध्द असेल तर ते म्हणजे लातूर पॅटर्न होय. आज शिक्षणाच्या क्षेत्रात लातूरने पुणे-मुंबईला मागे टाकले आहे. याचे सर्व श्रेय जाते ते येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाला. लातूर पॅटर्न सुरुवातीला अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु झाला होता. ज्यामध्ये दहावीच्या निकालानंतर पुढील दोन वर्ष ध्येयप्राप्तीसाठी विद्यार्थ्यांकडून जीवापाड मेहनत करवून घेतली जाते. अभ्यासक्रमांचे स्थुल व सुक्ष्म पातळीवरचे काटेकोर नियोजन, अतिरिक्त वर्ग तासिका, मासिक चाचणी आणि विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन देणे या घटकांवर लातूर पॅटर्न आधारलेला आहे .

**लातूर पॅटर्नची वैशिष्ट्ये:**

१. प्रत्येक विषयाचे स्थूल व सूक्ष्म पद्धतीने नियोजन करणे .

२. लवकरात- लवकर अभ्यासक्रम संपवणे व उरलेल्या वेळात जास्तीत जास्त सराव परीक्षा घेणे.

३. दर आठवड्याला चाचणी परीक्षा (weekly test) घेणे.

४. प्रत्येक विषयाच्या वेगळया तासिका घेऊन शेवटी त्या सगळयांची संयुक्त परीक्षा घेणे.

५. DSP म्हणजे Doubt Ssolving period घेणे. ज्यामध्ये क्लासमध्ये न समजलेल्या विषयावर किंवा अभ्यासानंतर निर्माण झालेल्या प्रश्नांचे निराकरण केले जाते. हे विद्यार्थ्यांसाठी फार उपयोगी पडते.

६. अभ्यासामध्ये दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेणे. त्यांच्या चुका त्यांना सांगणे, व सतत त्यांना प्रोत्साहित करणे.

७. शिक्षक व्यक्तीगतरित्या विद्यार्थ्यांवर लक्ष देतात.

८. पुस्तकी ज्ञानाशिवाय नैतिकताही शिकवली जाते.

९. महाविद्यालय सुरु झाले तेव्हापासूनच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षकातूनच मेन्टर नियुक्त केले जातात.

१०. विद्यार्थ्यांचा निकाल, त्यांच्या प्रगतीचा अहवाल पालकांना कळविणे.

११. विद्यार्थ्यांकडून एका दिवसात सलग १२ तासापर्यंत अभ्यास करवून घेणे.

१२. इतर पद्धतींमध्ये शिक्षक वर्गामध्ये येतात, शिकवतात व निघून जातात. परंतु राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये शिक्षक वर्गामध्ये आल्यानंतर विद्यार्थांशी संवाद साधतात, त्यांना शिकवतात, नैतिक समर्थन देतात.

१३. गुणवंत विद्यार्थ्यांचे पारितोषिक देवून सत्कार करणे.

१४. विद्यार्थ्यांच्या ज्ञानशाखा व व्यक्तीमत्त्व विकासामध्ये भर घालण्याचे महत्त्वाचे कार्य लातूर पॅटर्न करते.

आता लातूर पॅटर्न राजर्षी शाहू वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सुध्दा लागू करण्यात आलेला आहे व त्यामध्ये महाविद्यालयाला चांगले परिणाम मिळत आहेत.

**प्राध्यापकांचा सहभाग व शिक्षण पद्धती:**

इ.स. १९८२ पर्यंत वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक ११ वी व १२ वी चे वर्ग घेत असत. विद्यार्थी संख्या वाढावी व चांगल्या प्रकारचे विद्यार्थी आकर्षित व्हावेत म्हणून क्लासरुम टिचिंग व विद्यार्थी संपर्क पद्धती ठरविण्यात आली व तिची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्यात आली. त्या मधूनच महाविद्यालयामध्ये एक प्रकारचे 'वर्क कल्चर' निर्माण करता आले. नंतर कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांची भरती झाल्यानंतर त्यांनाही या वर्क कल्चरची माहिती व वळण देण्यात आले.

कोणतेही प्रकरण वर्गात जाऊन शिकविण्या अगोदर, त्याची रुपरेषा, व्याप्ती विशेष सांगण्यासारखे मुद्दे यांवर त्या त्या विषयातील वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापकांमध्ये बैठका होत असे. त्यामध्ये सविस्तर चर्चा घडवून आणली जात असे, म्हणून प्रत्येक तुकडीमध्ये शिकविण्याच्या पद्धतीत सारखेपणा निर्माण करता आला. या

मधून विद्यार्थ्यांच्या तक्रारी आपोआप कमी झाल्या. सर्वच प्राध्यापक समान दर्जाचे आहेत, हेही साध्य करता आले. विज्ञान शाखेतील विषय इंग्रजीतून शिकवावयाचे असले तरीही विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढविण्यासाठी मराठी भाषेतून स्पष्टीकरण देण्याची पद्धती अवलंबिण्यात आली. यामुळे विषय समजण्यास सोपे झाले, विद्यार्थ्यांत आवड निर्माण होऊन त्यांचा या प्रक्रियेमध्ये सहभाग वाढला. पुस्तकी भाषेचा अडसर दूर करण्यासाठी अत्यंत सोप्या भाषेत परंतु व्यापक स्वरुपाच्या नोट्सही देण्यात येत असत. क्लासरुम टिचिंगमध्ये विषय ज्ञानाबरोबरच परीक्षा पद्धतीवरही विशेष जोर देण्यात येत असे. एखाद्या प्रकरणातील कोणत्या भागावर कशा प्रकारचे प्रश्न विचारले जाऊ शकतात, किती प्रकारचे प्रश्न येऊ शकतात व त्यांची उत्तरे कशी असतील याचा तपशीलही विद्यार्थ्यांना दिला जात असे.

या पद्धतीने अभ्यासक्रम वेळेवर पूर्ण होणार नाहीत, त्याला जास्त अवधी लागणार याची जाणीव असल्यामुळे यासाठी जादा तासिका व संपर्क तासिकांचे नियोजन करुन प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना दिले जात असे. या सर्व बाबींची योग्य पद्धतीने अंलबजावणी होण्यासाठी विभागप्रमुखांना जादा अधिकार देण्यात आलेले होते. अंलबजावणीसाठी वरिष्ठ व कनिष्ठ स्तरावरील प्राध्यापकांची समन्वयक म्हणून नियुक्ती कण्यात येत असे. दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विज्ञान विभागातील सर्वच प्राध्यापकांची बैठक घेऊन उपक्रमांचा व अंमलबजावणीचा आढावा घेतला जाई. येणाऱ्या अडचणींवर चर्चेतून उपाय शोधले जात असत. कोणत्याही परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचे तास बुडू नयेत म्हणून पर्यायी प्राध्यापकाची सुद्धा सोय केलेली असे. याच बैठकीमधून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा व उपस्थितीचाही आढावा घेतला जाई. चांगल्या, होतकरु विद्यार्थ्यांना वेगवेगळया प्रकारचे प्रेत्साहन दिले जाई. चांगल्या व चुकार विद्यार्थ्यांचा एकूण अहवाल दर महिन्याला पलकांना पत्राद्वारे कळविला जातो. कधी-कधी पालकांना प्रत्यक्ष बोलावून, त्यांच्या पाल्याबद्दल चर्चा केली जाई. चांगले निकाल, योग्य सहभाग पाहून प्राध्यापकांनाही कांही सवलती व प्रोत्साहन दिले जाई. यामुळे प्राध्यापक वर्ग समाधानी राहून अधिक सहभाग वाढवू शकला. हे सर्व या महाविद्यालयामध्ये आजही सुरु आहे.

**उच्च महाविद्यालय व लातूर पॅटर्न:**

राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये उच्च शिक्षणामध्ये अनेक नवनवीन प्रयोग केले जातात. विद्यार्थी केंद्रित अनेक उपक्रम राबविले जातात. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी व पालक मेळावा घेतला जातो. त्यामध्ये प्राचार्य विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. स्वयंप्रेरित लोकच काहीतरी ठोस कार्य करून दाखवितात, जे समर्पणाच्या भावनेने काम करतात त्यांचा गौरव झाला पाहिजे, म्हणून संस्था शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याना प्रोत्साहन देण्यासाठी शाहुभूषण हा पुरस्कार देऊन सन्मानित करते. इ.स. १९७० पासून न खंड पडता शिक्षक

दिनादिवशी हा कार्यक्रम केला जातो व शिक्षकांच्या परिश्रमांचे कौतुक करून संस्थाचालकांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जातो.

उत्कृष्ट विद्यार्थ्यांची निवड करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी शाहूश्री पुरस्कार दिला जातो. जेणेकरून अधिक अभ्यास करण्याची व अभ्यासेतर विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल व ते आणखी जोमाने अभ्यास करतील .

महाविदयालयामध्ये मुलींचा व मुलांचा असे दोन स्वतंत्र राष्ट्रीय छात्र सेना विभाग आहेत. ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. कप्तान डॉ. भारती, कप्तान डॉ. शंकुतला कुलकर्णी यांनी मुलींच्या राष्ट्रीय छात्र सेना विभागात तसेच कप्तान प्रा. व्ही. बी .पवार, कप्तान डॉ. ओमप्रकाश शहापूरकर यांनी मुलांच्या राष्ट्रीय छात्र सेना विभागात योगदान दिले आहे. सध्या लेफ्ट. डॉ. अर्चना टाक व डॉ. महेश वावरे हे या विभागांचे काम यशस्वीपणे पाहत आहेत.

इ.स. १९७२ या दुष्काळी वर्षात महाविदयालयाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग सुरू केला. प्रा. मधुकर मुंडे यांनी ही अतिशय उत्साहाने राबविली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची आवड निर्माण झाली. विद्यार्थ्यांना आठ दिवसांसाठी एखाद्या गावामध्ये निवासी कॅम्पसाठी पाठवले जाते. यामध्ये विद्यार्थी गावामध्ये श्रमदान करतात. विविध व्याख्याने आयोजित केली जातात. परिणामी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणांचा विकास होतो. या राष्ट्रीय सेवा योजनेतून अनेक होतकरू विद्यार्थी घडले आहेत. राजर्षी शाहू महाविद्यालयाने कोविड-१९ च्या परिस्थितीमध्ये ऑनलाईन एन. एस. एस. कॅम्प आयोजित केला. गेल्यावर्षी एन. एस. एस .विभागाचे प्रमुख डॉ. कल्याण सावंत यांना उत्कृष्ट एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी म्हणून महाराष्ट्र राज्य शासनाने गौरविले आहे.

महाविदयालयामध्ये स्वतंत्र सांस्कृतिक विभाग आहे. याद्वारे देखील विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. विद्यार्थी स्वतःचे कला गुण प्रदर्शित करतात. अभ्यासासोबतच इतर कला गुणांनाही वाव मिळतो. महाविद्यालयाचे स्वतंत्र व प्रशस्त असे ग्रंथालय आहे. हे ग्रंथालय सकाळी ०८.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत चालू असते.

इतर महाविद्यालयापेक्षा राजर्षी शाहू महाविद्यालयाचे वेगळे महत्त्व सांगायचे म्हणजे या महाविद्यालयामध्ये सर्व वर्गांच्या व विषयांच्या नियमित तासिका होतात. इथे विद्यार्थ्यांच्या वर्गातील

तासिकांच्या उपस्थितीतीला गुण आहेत. त्यामुळे विद्यार्थी दररोज महाविद्यालयात उपस्थित राहतात व नियमितपणे तासिका करतात.

राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या मताला प्राधान्य दिले जाते. इथे शिक्षकांची नियुक्ती करताना तर सर्वप्रथम विद्यार्थ्यांपुढे त्या शिक्षकाचा डेमो क्लास घेतला जातो. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून त्यांचे मत जाणून घेतले जाते. जर विद्यार्थ्यांनी सकारात्मक मते दिली, तरच शिक्षकाची निवड केली जाते. आतापर्यंतच्या माझ्या शैक्षणिक अनुभवामध्ये मी हे पहिले महाविद्यालय पाहिले आहे जिथे विद्यार्थ्यांच्या मताला एवढे प्राधान्य दिले जाते. हे महाविद्यालय पूर्णपणे विद्यार्थी केंद्रित आहे. विद्यार्थी केंद्रित असे विविध उपक्रम राबविले जातात.

एखादया गोष्टीचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात अनुभव यावा यासाठी मुलाखती घ्यायला लावणे, अभ्यासाशी संबंधित विविध स्थळांना भेटी देणे, मनोरंजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाशी संबंधित चित्रपट दाखविणे, विविध स्पर्धांचे आयोजन करणे इ. ना प्राधान्य दिले जाते. भारतीय स्वातंत्र्यलढयातील प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकांची पुण्यतिथी, जन्मदिवस साजरा केला जातो. त्यानिमित्ताने विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. विदयार्थ्यांना राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, परिषदांमध्ये लेख लिहिण्यासाठी म्हणजे शोधनिबंध लिहण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक विषयाची विद्यार्थी मंडळे स्थापन केली जातात. ज्यामध्ये विद्यार्थी स्वतः स्वेच्छेने कार्य करतात. विविध उपक्रम राबवतात. कार्यक्रमाची आखणी करतात व त्या कार्यक्रमाचे व्यवस्थापन विद्यार्थी स्वत: करतात. परिणामी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होतो. त्यांच्या कला-गुणांना वाव मिळतो व नेतृत्वगुणाचा विकास होतो.

लातूर पॅटर्नचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणेज येथील प्राध्यापक महाविद्यालयात येताना सकाळी घड्याळ पाहून येतात, परंतु जाताना मात्र घड्याळ पहिले जात नाही. इच्छित उद्दिष्टे साध्य झाल्याशिवाय कोणीही घरी जात नाही. महाविद्यालयाचे प्राध्यापक आतोनात कष्ट करतात. महाविदयालयासाठी अतिरिक्त वेळ देतात. प्राध्यापक कुटुंबापेक्षा जास्त महाविद्यालयाला प्राधान्य देतात. महाविद्यालयामध्ये वेळेचं बंधन नाही. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास हाच इथल्या शिक्षणाचा मुख्य उदेश आहे. लातूर पॅटर्नद्वारे curricular activities व co- curricular activities यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास केला जातो. Curricular Activities या सर्वाधिक महत्त्वाच्या असतात विविध विद्याशाखातील

निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासक्रमांचे जे अध्ययन केले जाते त्याचा curricular activities मध्ये समावेश होतो. एन.सी.सी. एन. एस. एस. स्पोर्टस, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्याख्याने, परिसंवाद, कला संगीत, नाटक आदि उपक्रमांचा समावेश Extra-curricular activities मधे होतो.

**लातूर पॅटर्नचे महत्त्व:**

लातूर पॅटर्नने महाराष्ट्राला शेकडो डॉक्टर व इंजिनिअर दिले. इतर क्षेत्रांनादेखील आवश्यक असणारे मनुष्यबळ त्याने पुरविले. लातूर पॅटर्नने देशामध्ये वेगळीच छाप निर्माण केली आहे. राजर्षी शाहू महाविद्यालयाने ध्येयवादी विद्यार्थी निर्माण केले आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. विद्यार्थी ध्येय केंद्रित झाले आहेत व त्यांचा संपूर्ण वेळ त्यांच्या ध्येयप्राप्तीसाठीच खर्च केला जातो. लातूर पॅटर्नने विद्यार्थ्यांसाठी यशाचा मार्ग सोपा केला आहे. यासाठी त्यांची एकच अट आहे आणि ती म्हणजे अथक परिश्रम.

**लातूर पॅटर्नचा समाजावर पडलेला प्रभाव:**

विद्यार्थ्यांना अभ्यासाची शिस्त लागली आहे. मोटेगावकर क्लासेस संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे कारण मोटेगावकर क्लासेसने लातूर पॅटर्नचा स्वीकार केलेला आहे.

१. लातूर पॅटर्नचा राज्यातील अनेक कोचिंग क्लासेसने स्वीकार केला व त्यामुळे त्या-त्या क्लासेसची नावे प्रसिद्ध झाली.

२. लातूर पॅटर्नचा समाजावर पडलेला एक प्रभाव म्हणजे इथे मुली फार सुरक्षित असतात व त्यामुळेच महाविद्यालयामध्ये मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे. पालक मोठ्या विश्वासाने आपल्या मुलीना याच महाविद्यालयात पाठविण्यास प्राधान्य देतात.

३. महाविद्यालयामध्ये सुध्दा विद्यार्थ्यांमध्ये विद्यालयीन शिस्त लागली.

४. पालक विख्यार्थ्यांना शाहूमध्येच पाठवायचे असे ठरवितात.

५. लातूर पॅटर्न ने लोकांना मार्केट उपलब्ध करून दिले आहे.

६. हजारो लोकांना उपजीविकेच साधन या पॅटर्नमुळे उपलब्ध झाले आहे .

# प्रकरण तिसरे :
# लातूर पॅटर्नचे जनक :
# प्राचार्य अनिरुद्ध जाधव

## प्रकरण तीन

## लातूर पॅटर्नचे जनक : प्राचार्य अनिरुद्ध जाधव

प्राचार्य अनिरुद्ध जाधव सरांचे संपूर्ण नाव अनिरुद्ध साहेबराव जाधव आहे. जाधव सरांचा जन्म इ.स. १९३७ यावर्षी झाला. त्यांचे मूळ गाव लातूरच्या दक्षिणेला पाच-सहा किलोमीटर अंतरावर असलेले कातपूर हे आहे. या गावच्या दक्षिणेला त्यांच्या वाडवडिलांनी बांधलेला चिरेबंदी वाडा आहे. या वाड्यामध्येच जाधव सरांचे बालपण गेले. त्यांचे वडील साहेबराव हे नाना या नावाने परिचित होते. ते शिक्षणप्रेमी होते. शिकणाऱ्या मूलांचे त्यांना भारी कौतुक वाटत असे. म्हणूनच त्यांनी जाधव सरांना शिक्षणासाठी सहकार्य केले.

जाधव सरांचे प्राथमिक शिक्षण त्यांचे बंधू केशव पवार, यांच्यासोबत लातूरमधील मारवाडी राजस्थान विद्यालयामध्ये झाले. चौथी ते सातवीपर्यंतच शिक्षण याच शाळेत झाले. ते दररोज कातपूरहून मारवाडी राजस्थान विद्यालयापर्यंत ये-जा करत असत. गावातून निघाल्यानंतर आमराई, खोब्याची विहीर, उंच बगाडाची गिरणी, गोलाई आणि तिथून दयाराम रोड या रस्त्याने ते शाळेत जात असत. इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जाधव सर व त्यांचे मित्र लातूरमध्येच दयाराम रोडला कुंभाराच्या वाड्यात माडीवर खोली घेवून राहू लागले. त्यावेळी भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. परंतु हैद्राबाद संस्थान मात्र निजामाच्या वर्चस्वाखाली होते. रझाकाराची चळवळ जोरात चालू होती.

जाधव सरांना शेतीची फार आवड आहे. लहानपणी शाळेतून घरी परत आल्यानंतर ते शेतीची कामे करत असत. सुट्टीच्या दिवशी तर ते पूर्ण दिवस शेतात काम करत असत. जाधव सरांच्या शेतीच्या आवडीबद्दल प्रा. ना. ह. कनामे आवर्जून उल्लेख करतात. उन्हाळयाच्या सुट्टीत आमराईची देखरेख करणे. ते आंबे उतरुन घेणे. मोजणे इ. कामे जाधव सर करत असत. जाधव सरांच्या आईंचे नाव पार्वती. त्या अत्यंत अबोल सोशिक, प्रेमळ व अतिसंवेदनशील स्वभावाच्या. त्या सर्वांशी प्रेमळपणाने वागत असत. खेड्यांमध्ये साजरा करण्यात येणाऱ्या सणांमध्ये पोळा हा सण जाधव सरांचा सर्वाधिक आवडता सण. जाधव सर पोळयाच्या दिवशी उपवास ठेवत असत. संध्याकाळी बैलांची पूजा करून व त्यांना पोळी भरविली की मगच सर जेवण करत असत. त्यांच्या वडिलांकडे नंद्या–पाखऱ्या नावाची बैलजोडी होती. जाधव सरांचे या बैलजोडीवर आतोनात प्रेम होते.

**शिक्षण:**

त्याकाळात आठवीचे वर्ष अत्यंत महत्त्वाचे असे. कारण इथूनच पुढे विद्यार्थी विज्ञानशाखेकडे जायचे की कला शाखेकडे जायचे हे ठरवता येत असे. आठवीला जाधव सरांनी ऐच्छिकक विषय म्हणून उच्च गणित विषय निवडला. उच्च गणित व अंक गणित या व विषयांमध्ये कधीही जाधव सरांना ८०% पेक्षा कमी गुण पडले नाहीत.

दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत जाधव सरांना उच्च गणित व अंक गणित या दोन्ही विषयात ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त झाले. इ.स. १९५४ यावर्षी जाधव सर मॅट्रिकची परीक्षा द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. पुढील शिक्षणाची लातूर मध्ये सोय नव्हती. जाधव सरांचे वडील नाना कोर्ट कचेरीच्या कामासाठी सतत हैद्राबादला जात असत. त्यांनी ठरवलं होत की, जाधव सरांना पुढील शिक्षणासाठी हैद्राबादला पाठवायचे.

हैद्राबादच्या इंटरमीजिएट कॉलेजमध्ये जाधव सरांचे ॲडमिशन करण्यात आले. कॉलेजपासून दोन कि.मी. अंतरावर असलेल्या मराठा होस्टेलवर नानांनी त्यांची रहायची व्यवस्था केली. जाधव सरांचे लातूरमधील वर्गमित्र सोपान व आणखी काही मित्र तिथे रहायले लागले. मराठा हॉस्टेलवर संपूर्ण मराठवाड्यातून आलेली मुलं राहत असत. त्यामध्ये उस्मानाबादच्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती. जून १९५४ ते नोव्हेंबर १९६० असे एकूण साडे-सहा वर्ष जाधव सर शिक्षणासाठी हैद्राबादमध्ये राहिले. दहावीनंतर इंटरमीजिएट हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम होता. दोन वर्षाच्या शेवटी इंटर सायन्सची परीक्षा होत असे व त्यातील गुणानुसार मेडिकल व इंजिनिअरिंगसाठी प्रवेश मिळत असे. जाधव सरांचे इंटरमिजिएट चे पहिले वर्ष तेथील परिस्थितीत सामावून जाण्यात गेले. नंतर हळू-हळू हॉस्टेल मधील मित्रांसोबत त्यांचे मन रमू लागले. अधून-मधून ते सिनेमाही बघायला जात असत. होस्टेलवर असताना त्यांना दररोज वर्तमानपत्र वाचण्याची सवय लागली. वर्तमानपत्र वाचत असताना सर्वप्रथम त्यांचे लक्ष सिनेमांच्या जाहीरातीकडे जात असे. ते कधी-कधी कॉलेजचे तास बुडवून सिनेमा पहायला जात असत. इतर दिवशीही कॉलेजचे तास बुडवून हैद्राबादमधील प्रसिद्ध गव्हर्नमेंट स्टेट लायब्ररीत जात असत. तिथेही सिनेमासंदर्भातील पुस्तके, साप्ताहिके, मासिके इ. सर वाचत असत. जाधव सरांचे आत्मचरित्र "मनासी संवाद आपला चि वाद आपणांसी" या मध्ये सर म्हणतात की, हैद्राबादेतील साडे सहा वर्षांचे माझे वास्तव्य सुसह्य करण्यामध्ये १९५४ ते १९६० पर्यंत आलेल्या सिनेमांचे फार मोठे योगदान आहे.

जून १९५४ मध्ये जाधव सर इंटरमिजिएटची परीक्षा पास झाले. त्यानंतर त्यांनी उस्मानिया विद्यापीठामध्ये कला शाखेमध्ये प्रवेश घेतला. परंतु जाधव सरांना लहानपणापासूनच शेतीची आवड असल्यामुळे कोणालाही न विचारता जाधव सरांनी परभणीच्या अँग्रीकल्चर कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कॉलेज सुरूही झाले. सरांनी आठ दिवस कॉलेज केले. परंतु जेव्हा हे सर्व प्रकरण नानांना समजले तेव्हा ते सरळ परभणीला गेले व तेथून जाधव सरांना परत घेवून आले. परत हैद्राबादमधील उस्मानिया विद्यापीठामध्ये प्रवेश घेतला परंतु यावेळी विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेतला. परंतु सरांना अँग्रीकल्चर उगीच सोडल याची खंत वाटू लागली. सर बी.एस्सी. ला असताना त्यांचे चुलतभाऊ मधुकर देशमुख व निलंगा येथील त्यांचे मित्र आत्माराम धुमाळ असे तिघे जण रुम करून राहत होते. त्यावेळी ते तिघेही रूमवर स्वतः हाताने स्वयंपाक करून खात असत. जाधव सरांकडे वरण व भाजी करण्याचे काम असे. डिग्रीच्या साडे-तीन वर्षात सर एकही दिवस कॉलेजला गेले नाही आणि कॉलेजमध्ये गेले तरी ते पिरियड करत नसत .या तीन वर्षात ते कित्येकदा नापास झाले. तरीही- सरांच्या वडिलांनी त्यांना पुढे शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. इंटरमिजिएट आणि डिग्री मिळून चार वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करावयास जाधव सरांना साडे सहा वर्षे लागली.

ऑक्टोबर इ.स. १९६० यावर्षी जाधव सर बी.एस्सी चे शिक्षण पूर्ण करून हैदराबादहून गावाकडे परत आले. तिथून पुढच्या एक वर्षामध्ये जाधव सर पूर्णपणे शेतकरीच झाले. चोवीस तास जाधव सर शेतीतच राहू लागले. परंतु नानांची इच्छा होती की, त्यांचा मुलगा वकील झाला पाहिजे. जाधव सरांच्या अशा वागण्यामुळे नानांनी पाडव्याच्या दिवशी सरांना सांगितले की, “तुम्हाला शेवटचा आणि निर्वाणीचा इशारा सांगतो, हे शेत हा बैल बारदाना सगळ सोडायच तुम्ही जर येत्या जून पासून औरंगाबादला एल.एल.बी. च शिक्षण घ्यायला गेला नाहीत तर मी इथं या अंब्याच्या झाडाला फाशी घेईन.” नानांचा तो अवतार पाहून जाधव सर घाबरले आणि याचवेळी नाईलाजाने जाधव सरांनी पुढील शिक्षणासाठी औरंगाबादला जाण्याचा नानांना शब्द दिला.

जून १९६१ यावर्षी जाधव सरांनी एल.एल.बी साठी मराठवाडा विद्यापीठामध्ये औरंगाबाद येथे प्रवेश घेतला. लॉ कॉलेजचे वर्ग संध्याकाळी सहा ते नऊ या वेळेत भरत असत. त्यावेळी जाधवसरांनी मराठवाडा विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागात स्टोअरकीपर म्हणून काम केले. लॉ च्या अभ्यासक्रमातील ‘भारतीय दंड संहिता’ हा सरांचा आवडता पेपर होता. एकीकडे लॉ चा अभ्यास आणि त्याच वेळी मराठवाडा विद्यापीठातील

प्राणिशास्त्र विभागात स्टोअरकीपर म्हणून काम चालू होते. एप्रिल–मे महिन्यात गावाकडून सरांचे आई-बाबा, भाऊ त्यांना भेटायला आले. त्यावेळी ते सर्व वेरूळ दौलताबाद इ. ठिकाणी फिरले.

लॉ चा शेवटचा पेपर झाला. जाधव सर रूम वर आले, त्यावेळी नाना रूमवर होते. त्यांनी सरांना सांगितले की आपल्याला मुलगी बघायला जायचं आहे. इस्थळच्या रामरावजी पाटील यांचे थोरले चिरंजीव नारायणराव काळदाते यांची ज्येष्ठ कन्या कुसुमताई यांच्याशी इ.स. १९६३ मध्ये पंढरपुर येथे जाधव सरांचे लग्न झाले. कुसुमताई यांनी नववीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते. त्यावेळी कातपूरमध्ये लग्न होऊन आलेली एकही मुलगी नववीपर्यंत शिकलेली नव्हती. लग्नानंतर जून १९६३ मध्ये सरांनी लातूरमध्ये वकीली व्यवसायाला सुरुवात केली. ॲडव्होकेट भारतलाल बाजपेयी यांच्याकडे दुय्यम वकील म्हणून कार्य केले. परंतु सरांना या वकीलीच्या कामामध्ये काही आवड निर्माण होईना. त्यांनी पुढे एम. एस्सी. करण्याचा निर्णय घेतला व हा निर्णय नानांना सांगितला. औरंगाबाद विद्यापीठात त्यांनी एम एस्सी. साठी प्रवेश घेतला. त्यांच्यासोबतच कुसुमताईंनीही त्यांचे उरलेले शिक्षण औरंगाबादमधूनच पूर्ण केले. इ.स. १९६४ यावर्षी जाधव सरांनी एम. एस्सी ला प्रवेश घेतला व इ.स. १९६६ यावर्षी सरांची एम. एस्सी पूर्ण झाली.

त्यानंतर योगायोगाने लातूरच्या दयानंद महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विषयाच्या प्राध्यापकाची जागा रिक्त होती. सरांनी अर्ज केला व मुलाखत झाल्यानंतर त्यांची निवड झाली. १९६६-६७ या एका शैक्षणिक वर्षापुरतेच सरांनी दयानंद महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्य केले. इ.स. १९६७ यावर्षी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका झाल्या. लातूर विधानसभा मतदार संघातून तत्कालीन सहकारमंत्री केशवराव सोनवणे थांबले होते. त्यांच्या विरोधात सरांचे चुलत सासरे बापू काळदाते हे थांबले होते. बापू काळदाते यांचा विजय झाला. दयानंद कॉलेजच्या मॅनेजमेंटवर त्यावेळी केशवराव सोनवणे व त्यांचे बंधू माणिकराव सोनवणे यांचे वर्चस्व होते. सोनवणे यांच्या पराभवामुळे दयानंद कॉलेजने सरांना नोकरीतून काढून टाकले.

यानंतर वकिली की प्राध्यापकी ? हा प्रश्न जाधव सरांपुढे निर्माण झाला. त्यांनी वकिलीच्या व्यवसायात कितपत भविष्य आहे हे जाणून घेण्यासाठी अहमदपूरच्या किशनराव देशमुख यांची भेट घेतली. त्यांनी वकिलीचा व्यवसाय कसा चांगला आहे हे सांगितले. जाधव सर लातूरला परत येण्यासाठी अहमदपुरच्या बसस्टॅन्डवर थांबले. तेवढ्यात उदगीर मार्गे जाणारी नांदेड-बिदर बस स्टँडवर आली. त्यावेळी सरांचे बंधु मधुकरराव देशमुख हे उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयामध्ये हिंदीचे प्राध्यापक होते, रात्री त्यांच्याकडे मुक्काम करावा व सकाळी उठून लातूरला जावे असा त्यांनी विचार केला. उदगीरच्या बसस्टँडवर ते

पहोचले परंतु त्यांना मधुकर देशमुख्यांच्या घराचा पत्ता माहित नव्हता. एका व्यक्तीने त्यांना उदयगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य ना.य. डोळे यांच्या घरासमोर सोडले. त्यांची प्राचार्य ना.य.डोळे यांच्याशी भेट झाली. त्यावेळी उदयगिरी संस्थेचे सचिव बाबासाहेब परांजपे हे देखील तेथेच उपस्थित होते. उदयगिरी महाविदयालयामध्ये वनस्पतीशास्त्र या विषयाच्या प्राध्यापकाची आवश्यकता होती व त्यासंदर्भातच सर त्यांना भेटायला आले आहेत, असा त्यांचा समज झाला. परंतु सरांच्या डोक्यात फक्त मधुकरराव देशमुखांच्या घराचा पत्ता विचारायचा हेच होते. तिथेच प्राचार्य ना. य. डोळे यांनी त्यांच्या हस्ताक्षरातील प्राध्यापक पदाच्या नियुक्तीचे पत्र जाधव सरांच्या हातात दिले व म्हणाले "जाधव तुम्ही उद्याच रुजू व्हा."

उदयगिरी महाविदयालय जाधव सरांच्या जीवनातील टर्निंग पॉईंट होता. १९६७ ते १९७१ अशी चार वर्षे जाधव सरांनी उदयगिरी महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्राचे विभागप्रमुख म्हणून काम केले. उदयगिरी कॉलेज मध्ये काम करीत असताना जाधव सरांना प्राचार्य ना य. डोळे यांची कार्यपद्धती फार आवडली. जाधव सर त्यांच्या आत्मचरित्रामध्ये उल्लेख करतात की, "उदयगिरी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम सुरू करण्यापूर्वी मी पूर्णपणे पारंपारिक विचारांचा, रूढी-परंपरा मानणारा , त्यावर श्रद्धा ठेवणारा माणूस होतो. परंतु प्राचार्य डॉ. ना.य. डोळे यांच्या सान्निध्यात आल्यावर त्यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव माझ्यावर पडला. तेंव्हापासून माझ्या केवळ विचारांतच परिवर्तन झाले, असे नव्हे तर माझे संपूर्ण व्यक्तीमत्त्वच बदलले."

रूढी परंपरांची जागा प्रखर बुद्धीवादाने व वैज्ञानिक दृष्टीकोनाने घेतली. तेव्हापासूनच मला अवांतर वाचनाचीही गरज भासू लागली व त्यातूनच वाचनाची आवड निर्माण झाली. माझ्यातील वैचारिक परिवर्तन हा माझ्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरला." जाधव सरांच्या व्यक्तीमत्वाला पैलू पाडण्याचे काम डॉ.ना.य.डोळे यांनी केले. बघता- बघता सर उदगीरमध्ये रमले. त्यांनी तेथील विद्यार्थी व सहकारी प्राध्यापक यांची मने जिंकुन घेतली. परंतु नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच चालू होते.

इ.स. १९६८ यावर्षी लातूर येथे वेगवेगळया क्षेत्रात व व्यवसायात कार्यरत असलेल्या काही ध्येयवादी व्यक्तींनी 'शिव छत्रपती शिक्षण संस्था' स्थापन केली. त्यामध्ये अँड. किशनराव साळुंके, मा. डॉ. गोपाळराव पाटील, डॉ. पी. आर देशमुख, डॉ. एन. पी. गरड, डॉ. विष्णुपंत गोरे, अँड. मुरलीधर शिंदे, इ. व्यक्तींचा समावेश होता. जाधव सरही या संस्थेचे संस्थापक सदस्य होते. इ.स. १९७० यावर्षी या संस्थेने राजर्षी शाहू महाविद्यालयची सुरुवात केली. इ.स. १९७१ यावर्षी महाविद्यालयात विज्ञान शाखा सुरू झाली. इ.स. १९७० मध्ये राजर्षी शाहू महाविद्यालय सुरू झाल्यानंतर सरांचे बंधु मधुकर देशमुख या महाविद्यालयात

हिंदीचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. विज्ञान विभाग सुरू झाल्यानंतर जाधव सरांनी राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये यावे अशी अनेकांनी इच्छा व्यक्त केली व संस्थेचे सर्वेसर्वा डॉ. गोपाळराव पाटील यांनी जाधव सरांचे मित्र प्रा. नागनाथ कनामे व इतर काही संस्थाचालकांच्या माध्यमातून जाधव सरांना शाहू महाविद्यालयामध्ये येण्यासंबंधी आग्रह सूरू केला. सरांनी शेवटी उदयगिरी कॉलेज सोडून राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये जाण्याचा निर्णय घेतला. या गोष्टीचा प्रा.ना.य.डोळे सरांना चांगलाच धक्का बसला. उदगीर सोडताना सरांची फार मानसिक ओढाताण झाली. सर उदयगिरी महाविद्यालय सोडून राजर्षी शाहू महाविद्यालयात जात आहेत, हे तेथील विद्यार्थ्यांना कळाल्यानंतर "जाधव सर आम्हाला पाहिजे आहेत त्यांना परत बोलवा" असे म्हणून विद्यार्थ्यांनी एक दिवसाचा संप केला होता.

१५ जून १९७१ रोजी जाधव सर राजर्षी शाहू महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. शाहू महाविद्यालयाची सुरुवातीची अवस्था फार वाईट होती व त्यावेळी खेड्यातील सामान्य शेतकरी, शेतमजूर, कामगार इ. ची मुले कॉलेजमध्ये येत व त्यातही ते विदयार्थी दहावी जेमतेम किंवा २-३ प्रयत्नात पास झालेले असत. शाहूचा प्रवेश म्हणजे डबल मार्क मेमो म्हणून गावात हिणवलं जात असे. खेड्यातील उच्च शिक्षित माणसांनी एकत्र येऊन काही एका विशिष्ट ध्येयाने लातूरसारख्या निमशहरी, ग्रामीण परिसरातील गावात शिक्षण संस्था स्थापन करून तिच्या द्वारे आजूबाजूच्या परिसरातील खेडयांत जन्मलेल्या मुलामुलींची जी उपजत गुणवत्ता प्राय: त्यांच्यामध्ये दडलेली होती ती सिद्ध करण्याची उजागर करण्याची आणि जगण्याच्या लढाईत त्यांनी समर्थपणे स्वतःच्या पायावर उभे रहावेत म्हणून नियोजनबद्ध पद्धतीनं जे परिश्रम येथे घेतले गेले यातून हा शैक्षणिक गुणवत्तेचा लातूर पॅटर्न उदयास आला.

**लातूर पॅटर्नची मुहूर्त मेढ:**

दहा+दोन+तीन हा शैक्षणिक आकृतिबंध इ.स. १९७१ या वर्षापासून लागू झाला. त्यावेळी मेडीकल इंजिनिअरिंगचे प्रवेश बी.एस्सी प्रथम वर्षात मिळालेल्या गुणांच्या आधारावर होत असत. कॉलजचे पहिले वर्ष म्हणजे पी.यू.सी. (Pre University Course) व पुढचे एक वर्ष बी.एस्सी. दोन्ही वर्षाच्या वार्षिक परीक्षा त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी विद्यापीठाकडून घेतल्या जात असत. प्राध्यपकांनी ठरविले की आपल्याकडे जी मुले येतात, ती अभ्यासात तेवढी हुशार नसतात. त्यामुळे सर्वप्रथम आठवी ते दहावी पर्यंतचा अभ्यासक्रम पी.यु.सी च्या पहिल्या सत्रात उजळणी स्वरूपात घेणे व नंतर दुसऱ्या सत्रामध्ये पी.यु.सी चे प्रत्यक्ष वर्ग सुरू करावे. परंतु हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात तीन महिने जाणार होते. ते तीन महिने भरून काढण्यासाठी

दिवाळीच्या सुट्ट्या एक महिन्याऐवजी फक्त आठ दिवस व उन्हाळयाची सुट्टी तीन महिन्याऐवजी फक्त १५ दिवस करण्यात आली. परिणामी विद्यार्थ्यांचा मुलभूत पाया मजबूत होत असे व विद्यार्थी आत्मविश्वासाने पी.यू.सी. च्या अभ्यासक्रमाला सामोरे जात असत. १९७२-७३ पासून सुट्या कमी करण्याची चालू झालेली ही प्रथा आजही चालूच आहे. सुरुवातीला राजर्षी शाहू महाविद्यालयाची विद्यार्थीसंख्या फार कमी होती. म्हणून खेड्यापाड्यात जावून विद्यार्थी जमा करावे लागत असत. जाधव सर, डॉ. जनार्दन वाघमारे सर, अर्थशास्त्राचे प्रा. विठ्ठल पवार, ॲड. बब्रुवान काळे इ. नी स्वतः गावागावांमध्ये जावून विद्यार्थी गोळा केले.

पूर्वी राजर्षी शाहू महाविदयालय नांदेड रोडवर होते. इ.स. १९७७ मध्ये काकूशेठ उक्का यांच्या जिनिंग मिलच्या जागी हे महाविद्यालय स्थलांतरित करण्यात आले. तेव्हा तिथे गरीब विद्यार्थ्यासाठी मोफत वसतिगृहही सुरू करण्यात आले. वसतिगृह चालविण्यासाठी प्राध्यापक स्वत: अन्न धान्य, पैसा इ. देत असत. त्यासोबतच गावाकडील लोकही मदत करत असत. राजर्षी शाहू महाविद्यालयाचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याची सुरुवात इ.स. १९७८ यावर्षी झाली. इ.स. १९८० मध्ये १२ वी विज्ञानाचे संग्राम गायकवाड व संजय देशमुख हे दोन विद्यार्थी विभागीय बोर्ड परीक्षेत गुणवत्ता यादीत आले. १९७०-८० चे दशक संस्था व महाविद्यालयाच्या दृष्टीने अतिशय खडतर होते. परंतु नंतर हळू-हळू विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये झळकू लागले व विद्यार्थ्यांची संख्याही वाढू लागली. १९८०-९० हे दशक खऱ्या अर्थाने महाविद्यालयाची ओळख निर्माण करून देणारे दशक ठरले. जसजसे बारावीचे निकाल वाढत गेले, तसतसे महाराष्ट्रभर महाविदयालयाची चर्चा होवू लागली. राजर्षी शाहू महाविदयालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना शाहू पॅटर्न म्हणून ओळखले जावू लागले. पुढे चालून माजी मुख्यमंत्री मा. श्री. विलासरावजी देशमुख यांनी त्याचे लातूर पॅटर्न असे नामकरण केले व सर्वदूर महाराष्ट्रात आपल्या भाषणातून या ‘लातूर पॅटर्नचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

इ.स. १९८५ नंतर सातत्याने दरवर्षी बारावी बोर्डाच्या परीक्षेत राजर्षी शाहू महाविद्यालयाचे एकतर्फी वर्चस्व राहिले. विज्ञानशाखेत गुणवत्ता यादीतील एकूण विद्यार्थ्यांपैकी ६०% विद्यार्थी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे असत. वाणिज्य शाखेच्या गुणवत्ता यादीत जवळपास ८०% विद्यार्थी राजर्षी शाहू महाविदयालयाचे असत. १९७३ ते १९९४ या कालावधीत जाधव सरांनी उपप्राचार्य म्हणून कार्य पाहिले व इ.स. १९९४ यावर्षी ते राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य झाले. प्राचार्य झाल्यानंतरही सरांनी एकही तासिका ऑफ जावू दिली नाही. ते प्रत्येक विद्यार्थ्यांची ओळख ठेवत असत. वर्गातील विद्यार्थी एखाद्या विषयात कमी पडला तर बोलावून घेऊन स्वतः अत्यंत जिकीरीने विचारपूस करत असत. २८ जून १९९९ या

दिवशी सरांनी आपल्या सेवेतून सेवानिवृत्ती घेतली. परंतु सेवा निवृत्तीनंतरही अनेक वर्ष सर नियमितपणे महाविद्यालयात जावून तासिका घेत होते . आता सरांचे वय ८५ वर्ष आहे. तरीही जाधव सर रोज महाविद्यालयात येतात व संस्थेची कामे करतात .

**प्राचार्य अनिरुद्ध जाधव यांना मिळालेले पुरस्कार:**

१. मुंबई प्रियदर्शनी अकादमीने इ.स. १९९१ यावर्षी प्रियदर्शनी पुरस्काराने सन्मानित केले.
२. शिव छत्रपती शिक्षण संस्थेने इ.स. १९९३ यावर्षी 'शाहू भूषण' या पुरस्काराने सन्मानित केले.
३. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाद्वारे इ.स. १९८८ मध्ये 'शिक्षक रत्न' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.
४. यशवंतराव चव्हाण स्मृती प्रतिष्ठान यांनी इ.स. १९८८ मध्ये आदर्श शिक्षक पुरस्कार व सन्मान पत्राने सन्मानित केले.
५. मराठवाडा लोकविकास मंच तर्फे इ.स. १९९८ मध्येच मराठवाडा गौरव या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
६. जाधव सरांच्या "मनाशी संवाद-आपुलाच वाद आपणासी" या आत्मचरित्रास मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा सर्वोत्कृष्ट प्रा. वि. ह. कुलकर्णी स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे.

# प्रकरण चौथे :

# उपसंहार

# प्रकरण चौथे

## उपसंहार

शिव छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना, राजर्षी शाहू महाविद्यालयाची सुरुवात व नंतर सुरू झालेला खडतर प्रवास या सगळ्या गोष्टींचा आढावा या प्रकल्प अभ्यासामध्ये घेण्यात आलेला आहे. शिक्षण क्षेत्रातील एक क्रांती म्हणजेच लातूर पॅटर्न, याच्या निर्मितीमध्ये अनेक जणांनी हातभार लावला आहे. त्यामध्ये शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील साहेब व प्रा. जनार्दन वाघमारे यांचाही मोलाचा वाटा आहे. इ.स. १९६८ मध्ये शिवछत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना झाली व इ.स. १९७० यावर्षी राजर्षी शाहू महाविद्यालय सुरू झाले. इ.स. १९७१ यावर्षी विद्यापीठाने महाविद्यालयात विज्ञानशाखा सुरू करण्याची परवानगी दिली. त्यावेळी डॉ. गोपाळराव पाटील साहेबांनी अत्यंत आग्रह करून प्राचार्य अनिरुद्ध सरांना उदगीरच्या उदयगिरी महाविद्यालयातून शाहू महाविद्यालयात येण्यास भाग पाडले. डॉ. गोपाळराव पाटील साहेबांनी एवढा आग्रह करून, जाधव सरांना बोलावले नसते तर लातूर पॅटर्नचा उदयच झाला नसता. त्यासोबतच शिव छत्रपती शिक्षणसंस्थेने व संस्थाचालकांनी जाधव सरांना महाविद्यालयामध्ये नवनवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहन दिले. डॉ. गोपाळराव पाटील साहेबांनी जाधव सरांना वेळोवेळी हवी ती मदत केली. आजही डॉ. गोपाळराव पाटील साहेब शिव छत्रपती शिक्षणसंस्थेच्या अध्यक्षपदी आहेत व संस्थेच्या विकासासाठी कार्य करीत आहेत.

राजर्षी शाहू महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे सर हे होते. त्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्यपद इ.स. १९७० पासून इ.स. १९९४ पर्यंत सांभाळले. १९७० ते ८० हा काळ महाविद्यालयासाठी अत्यंत खडतर होता. या काळात, महाविद्यालयाचे प्राचार्य वाघमारे सर होते. त्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी सर्वपणाने कार्य केले. गावोगावी जावून विद्यार्थी गोळा केले. विद्यार्थी, प्राध्यापक इ. वर नियंत्रण ठेवले. अनेक लोकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे लातूर पॅटर्न उदयास आला. महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर अवघ्या १०-१५ वर्षांमध्येच महाविद्यालय संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाले. जाधव सरांची मुलाखत घेताना ते म्हणले की "आम्ही आमच्या सोयीनुसार नियम बनवत होतो, कार्य करत होतो, यातूनच लातूर पॅटर्नचा उदय झाला.

लातूर पॅटर्नने विद्यार्थ्यांना त्यांचे ध्येय प्राप्त करण्यामध्ये फार मदत केली आहे . मी सध्या राजर्षी शाहू महाविद्यालयात बी. ए. तृतीय वर्षात शिकत आहे या महाविदयालयामध्ये मला फार चांगले अनुभव आले आहेत. सकाळी ०८.०० ते संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत कॉलेज विद्यार्थ्यांना सतत कामात व्यस्त ठेवत.

विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबविले जातात. जेणेकरून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. येथील शिक्षक, कर्मचारी इ. अहोरात्र काम करत असतात व त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी, त्यांच्या प्रयत्नांचा गौरव म्हणून संस्था शाहभूषण या पुरस्काराने त्यांना सन्मानित करते. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी 'शाहूश्री' हा पुरस्कार दिला जातो.

या प्रकल्पाच्या संदर्भात मी प्राचार्य अनिरुद्ध जाधव सर व प्राचार्य महादेव गव्हाणे सर यांची मुलाखत घेतली. जाधव सरांची मुलाखत घेत असताना मला वेगळाच अनुभव आला. सभ्यपणा, आपूलकी, साधेपणा इ. मी अनुभवले. त्यांचे व्यक्तीमत्त्व म्हणजे एक क्रियावान पंडित, होय असे. डॉ गोपाळराव पाटील सरांनी त्यांच्याबद्दल मत व्यक्त केले आहे. डॉ. रावसाहेब कावळे सर हे प्राचार्य असताना त्यांच्या प्रयत्नामुळेच राजर्षी शाहू महाविदयालयास नॅकचा 'A' ग्रेड मिळाला. त्यावेळी मराठवाडयात नॅकचा (NAAC) 'A' ग्रेड मिळविणारा राजर्षी शाहू महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय होते. राजर्षी शाहू महाविद्यालयाला २०१३-१४ पासून स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला. स्वायत्त महाविद्यालयाचे आव्हान स्विकारणारे देखील मराठवाड्यातील हे पहिले महाविद्यालय ठरले. मी मुलाखत घेताना जाधव सरांनी मला सांगितल की, "स्वायत्तता स्विकारण्यापूर्वी आम्ही स्वायत्ततेचा प्रयोग केला होता." निश्चितपणे त्यांचे हे सर्व प्रयोग यशस्वी ठरले.

राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या सातत्याने उत्कृष्ट  लागणाऱ्या निकालांमुळे या एकच महाविद्यालयाचे जास्तीत-जास्त विद्यार्थी बोर्डाच्या मेरिट लिस्ट मध्ये येवू लागल्याने व मेडिकल, इंजिनिअरिंगसाठी, आय. आय.टी. साठी, राष्ट्रीय तंत्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश मिळविण्यास पात्र ठरू लागल्याने संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर काही प्रमाणात इतर राज्यांतूनही हुशार विद्यार्थ्यांचा ओघ अकरावी-बारावी या दोन वर्षांसाठी राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी वाढत गेला. महाराष्ट्रातून व इतर राज्यातून या महाविद्यालयात येणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांना योग्य न्याय मिळायला हवा यासाठी त्याच क्षमतेचे शिक्षक त्यांना उपलब्ध करून देण्याचे महाविद्यालय सतत प्रयत्न करते. त्यासाठी शिक्षकांमधील आत्मविश्वास वाढविणे, शिक्षकांचा योग्य आवाज, शिक्षकांची देहबोली, फळयाचा योग्य वापर, विद्यार्थ्यांचा फिडबॅक घेवून शिक्षकांची नियुक्ती करणे इ. काटेकोर नियम संस्थेद्वारे पाळले आतात. शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या संस्थाचालकांनी सुरुवातीलाच धोरणात्मक असे काही खूप चांगले व दुरगामी परिणाम करणारे निर्णय घेतले.

१. प्राध्यापक शिक्षक व इतर कार्यालयीन कर्मचारी यांची निवड केवळ गुणवत्तेच्या आधारावर करणे. यामध्ये कधीही जात-पात, धर्म, नाते संबंध इतर यांचा विचार केला जाणार नाही.

२. कोणत्याही शिक्षकाकडून, प्राध्यापकाकडून, वा कर्मचाऱ्याकडून नियुक्ती देताना कधीच कसलीच देणगी घ्यायची नाही व पुढेही कधी घेतली नाही.

३. शिक्षक प्राध्यापकांच्या खाजगी शिकवणीवर पूर्णपणे बंदी.

४. शाळा कॉलेजच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजात कसलाच हस्तक्षेप करायचा नाही.

५. शाळा कॉलेजच्या परिसरात किंवा प्रशासनात कोणत्याही प्रकारच्या राजकारणाचा संबंध राहणार नाही.

६. शिक्षणात नैतिकता व चारित्र्य यांचा आग्रह.

७. शैक्षणिक गुणवत्तेसाठी उत्कृष्टतेचा ध्यास हे मिशन.

ही सर्वच्या सर्व पथ्ये संस्थेने आजवर अत्यंत काटेकोरपणे पाळलेली आहेत. संस्थेला आज जे काहीं यश मिळाले आहे त्यापाठीमागे संस्थेचा हा दूरदृष्टीपणा कारणीभूत आहे. आज संस्था तिच्या सुवर्णयुगाचा काळ अनुभवते आहे.

# संदर्भ सूची

# संदर्भ सूची

**प्राथमिक साधने:**

**प्रकाशित साधने:**

**मराठी:**

**वार्षिक अंक:**


१. शब्दगंध, १९७४-७५.

२. शब्दगंध, १९७७-७८.

३. शब्दगंध, १९८०-८१.

४. शब्दगंध, १९८२-८३.

५. शब्दगंध, १९९०-९१.

६. शब्दगंध, १९९४-९५.

७. शब्दगंध, १९९६-९७.

८. शब्दगंध, १९९७-९८.

९. शब्दगंध, १९९८-९९.

१०. शब्दगंध, १९९९-२०००.

११. शब्दगंध, २०००-२००१.

१२. शब्दगंध, २००१-०२.

१३. शब्दगंध, २००२-०३.

१४. शब्दगंध, २००३-०४.

१५. शब्दगंध, २००४-०५.

१६. शब्दगंध, २००५-०६.

१७. शब्दगंध, २००६-०७.

१८. शब्दगंध, २००७-०८.

१९. शब्दगंध, २००८-०९.

२०. शब्दगंध, २०१०-११.

२१. शब्दगंध, २०११-१२.

२२. शब्दगंध, २०१२-१३.

२३. शब्दगंध, २०१३-१४.

२४. शब्दगंध, २०१४-१५.

२५. शब्दगंध, २०१५-१६.

२६. शब्दगंध, २०१६-१७.

२७. शब्दगंध, २०१७-१८.

२८. शब्दगंध, २०१८-१९.

२९. शब्दगंध, २०१९-२०.


**ग्रंथ:**


१. गरुडझेप, सुवर्णमहोत्सव स्मरणिका, २०१७-१८.

२. डॉ. गोपाळराव पाटील, सत्य असत्याशी मन केले ग्वाही, ईशावास्यम प्रकाशन, लातूर, २०१८.

३. प्राचार्य अनिरुद्ध जाधव, मनाशी संवाद : आपुला चि वाद आपणांसी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०२१.


## दुय्यम साधने:

## प्रकाशित साधने:

## इंग्रजी:


1. Chitnis K. N. Research Methodology in History, Indira Printing Press, Poona, 1979.
2. Latur District Gazetteer, Government of Maharashtra, Mumbai.

### मराठी:

### ग्रंथ:

१. प्रकाशक डॉरावसाहेब . कावळे, शोध गुणवत्तेचा- लातूर पॅटर्नचे जनक प्राचार्य अनिरुद्ध काढव गौरवग्रंथ ,२०००.

२. कांदे पाटील विद्याधर, कर्मयोगी डॉ. गोपाळराव पाटील, फ़िनिक्स प्रकाशन, , २०१७.

३. सौ. देशमुख स्नेहलता, ध्यास उत्कृष्टतेचा, वावर प्रकाशन, लातूर, मार्च २०१८.

४. सरदेसाई बी.एन., इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी, २००५.

५. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,ऑक्टोबर, २००५.

६. देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन,२००२.

७. सातभाई श्रीनिवास, इतिहासलेखनशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून, २०११.

### लेख:

१. डॉ. अर्चना टाक, महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील मानदंड : लातूर पॅटर्न, B-Aadhar International Peer Reviewed Indexed Research Journal, ISSN, 2278-9308, September 2021 (IF:7.675).

### मुलाखती :

१. प्राचार्य अनिरुद्ध जाधव, सचिव, शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर.

२. डॉ. महादेव गव्हाणे, प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर.

**YouTube Link:**

1. https://youtu.be/CXnQDeOH8mY

****************************************************************************************************

# परिशिष्ट

**Shiv Chhatrapati Shikshan Sanstha's**

## Rajarshi Sahu Mahavidyalaya (Autonomous), Latur

### Awards and recognition received from Government and other recognized bodies

| Sr. No. | Award/Recognition | Awarding Bodies | Date |
|---|---|---|---|
| 1 | ISO 9001:2015 Certification | Quality Control Certification, Delhi | 27.04.2019 |
| 2 | India's 10 Best Institutions of Biological Sciences for 2019 | The Knowledge Review Magazine | 26.04.2019 |
| 3 | Shramadan Puraskar-2019 | Gram Panchyat Karyalaya, Kasargav, Hanumantwadi, TQ.Dist. Latur. | 20.03.2019 |
| 4 | Certificate for the establishment of Institution Innovation Council (IIC) | AICTE, New Delhi | 21.11.2018 |
| 5 | Accredited B++ Grade with CGPA 2.99 | National Assessment and Accreditation Council (NAAC), Begalore | 26.09.2018 |
| 6 | Certificate of Commitment to uphold highest standards of integrity and good governance | Central Vigilance Commission, New Delhi | -- |
| 7 | Appreciation for contribution in HIV/AIDS Awareness Programme | District AIDS Prevention & Control Unit, Civil Surgeon Office, Latur | -- |
| 8 | Extension of Autonomous Status | University Grants Commission | 15.10.2019 |
| 9 | The National Education Excellence Award 2020 | Praxis Media Pvt. Ltd., NOIDA | 19.06.2020 |
| 10 | Appreciation for conducting the Zonal Center Program on Cheminformatic & Drug Design | Wetlab Championship & Shaastra IIT Madras Event | 19.07.2019 |
| 11 | All India Level 92nd Rank in EducationWorld Autonomous Colleges (Govt. and Govt. Aided) ranking-2020 | Education World, Bengaluru | 28.06.2019 |
| 12 | 92nd Rank in Educational World Private Autonomous College Ranking – 2020 | Education World, Bengaluru | 05.01.2021 |
| 13 | Academic Excellence Award in Higher Education -2021 | Top Gallant Media, NOIDA, Uttar Pradesh | 03.01.2021 |
| 14 | Vanashree Award - 2020 | Green Latur Vruksh Mitra, Latur | 21.02.2021 |
| 15 | Paryavaran Mitra Puraskar - 2020-21 | Sangam Nursery, Latur | 12.30.2020 |
| 16 | National Education Excellence | Praxis Media for Best Higher | 10.01.2020 |

| | | | |
|---|---|---|---|
| | Award, 2020 | Education Institute in Maharashtra, NOIDA, Uttar Pradesh | |
| 17 | Appreciation for effective organization of Yuvati Karyashala | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | 14.09.2020 |
| 18 | State Level Best College Award 2020-2021 | Govt. of Maharashtra, Higher & Technical Education Department. (NSS) | -- |
| 19 | Certified as Eat Right Campus | Food Safety and Standards Authority of India (FSSAI) | |
| 20 | Received First Prize in Nanded Region for Career Katta initiative | Govt. of Maharashtra Higher & Technical Education Department and MITSC | 17.05.2022 |
| 21 | ISO 9001:2015 Certification | Quality Research Organization, Delhi | 14.05.2022 |
| 22 | Appreciation for active participation in National Intellectual Property Awareness Mission (NIPAM) in association with RGNIIPM, Nagpur | Office of the Controller General of Patents, Designs and Trade Marks, Govt. of India | 08.02.2022 |
| 23 | Appreciation for significant contribution in Fundraising on the occasion of Armed Forces Flag Day | Zilla Sainik Welfare Office, Latur | 20.12.2021 |
| 24 | Best College Award (Urban Area) 2021-22 | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | 01.12.2021 |
| 25 | Leading & Most Trusted Autonomous Degree College of the Year 2021, National Educational Excellence Awards & Conference | Beginup Research Intelligence Pvt. Ltd., Begaluru | 23.09.2021 |
| 26 | Received 'O' Grade in University Academic and Administrative Audit 2022-23 | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | 22.10.2022 |
| 27 | Letter of Honour for organizing Blood Donation Camp | Vilasrao Deshmukh Government Medical College, Latur | 11.10.2022 |
| 28 | Letter of Honor for the significant contribution in Tree Plantation beside Manjara River under the programme Azadi ka Amrit Mahotsav | District Collectorate, Latur | 24.07.2022 |

**Reference:** www.shahucollegelatur.org.in

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या वतीने

### शाहूरत्न व शाहूभूषण पुरस्कारप्राप्त व्यक्तींची यादी

| अ.क्र. | शाहूरत्न पुरस्काराचे मानकरी |
|---|---|
| १ | डॉ. जनार्धन माधवराव वाघमारे |
| २ | श्री. अनिरुद्ध साहेबराव जाधव |
| ३ | डॉ. रावसाहेब लिंबराव कावळे |




**अभियांत्रिकी शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्या राजर्षी शाहू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रमाण**




**वैद्यकीय शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्या राजर्षी शाहू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रमाण**



शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे संस्थापक सदस्य - इ. स. १९६८




इ. स. १९७० ते ७६ या काळात नांदेड रोडवरील या इमारतीमध्ये राजर्षी शाहू महाविद्यालय भरत असे.




मा. डॉ. गोपाळराव पाटील, राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या इमारतीची पायाभरणी करताना, दि. ०१.०४.१९७१




राजर्षी शाहू महाविद्यालयची सध्याच्या जागेतील जुनी इमारत

# संस्थेस मान्यवरांच्या भेटी... (निवडक)

| | |
|---|---|
|  |  |
| मा. ना. बाळासाहेब देसाई व मा. ना. शिवाजीराव निलंगेकर | डॉन बॉस्को संस्था, मुंबई येथिल फादर मॅश्चिओ यांच्यासमवेत ॲड. किशनराव साळुंके व ॲड. नारायणराव पाटील |
|  |  |
| मा. फ. मु. शिंदे व मा. श्री. रविंद्र सुर्वे | सुप्रसिद्ध अभिनेते मा. निळू फुले |
|  |  |
| सुप्रसिद्ध अभिनेते मा. श्रीराम लागू | मा. श्रीमती गेल ऑमवेट |

# संस्थेस मान्यवरांच्या भेटी...(निवडक)



मा. डॉ. सुनिल गायकवाड



मा. जगदिश खेबुडकर



मा. मोहन धारिया



मा. वसंतराव पुरके



मा. जे. पी. डांगे जिल्हाधिकारीए उस्मानाबाद जि. आणि मा. स्वामी अग्निवेषजी, विरोधी पक्षनेते, हरियाणा राज्य



मा. अण्णा हजारे

## संस्थेस मान्यवरांच्या भेटी...(निवडक)



मा. दिलीपरावजी देशमुख



मा. मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख



मा. डॉ. पंडित विद्यासागर



मा. डॉ. कुमार सप्तर्षी




मा. धनंजय मुंडे



मा. बाळासाहेब थोरात




**२२ जानेवारी २००० रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्थेने मा. प्राचार्य अनिरूद्ध जाधव सरांचा डॉ. ना. य. डोळे यांच्या अध्यक्षतेखाली जो सत्कार केला, त्या समारंभात बोलताना महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री मा. विलासरावजी देशमुख.**



**१३ जुलै २०१८ रोजी मुंबई येथे संपन्न झालेल्या कॉलेज ऑफ फिजिशिअन्स ॲन्ड सर्जन्सच्या १४४ व्या दिक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मा. प्राचार्य अनिरूद्ध जाधव सर.**



**प्रकल्प अभ्यास लेखक विद्यार्थीनी कु. कोमल राठोड, बी. ए. टी. वाय. (२०२२-२३) मुलाखती दरम्यान मा. प्राचार्य अनिरूद्ध जाधव सरांसमवेत.**



**मा. प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे सर यांची मुलाखत घेताना प्रकल्प अभ्यास लेखक विद्यार्थीनी कु. कोमल राठोड, बी. ए. टी. वाय. (२०२२-२३).**




राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर चे प्रवेशद्वार.




राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर ची प्रशस्त इमारत.